**प्रेसनोट** **दि.१५/०५/२०२४**

**समता सहकारी बँक नागपूर येथील**

**आर्थिक फसवणुकीच्या गुन्ह्यातील फरार आरोपीस केले जेरबंद**

**१७ वर्षापासून गुंगारा देणाऱ्या आरोपीस सीआयडी ने घातल्या बेड्या**

---

सिताबर्डी पोलीस ठाणे, नागपूर गु.र.नं. ३३८/२००७ भा.द.वि.कलम ४०६,४०८,४०९,४६७ ,४६८, ४७१, ४२०, २०१,१२० (ब), १०९,३४ सह कलम ३,४ एम पी आय डी व ६५ आय टी कलमाप्रमाणे समता सहकारी बँक नागपूर येथील विविध अधिकारी / कर्मचारी , बँकेचे अध्यक्ष, उपाध्याक्ष, संचालक मंडळ, कर्जदार आरोपित व अमन हेमानी तसेच राजश्री हेमानी यांनी सन १९९७ ते २००७ या कालावधीमध्ये आपापसात संगनमत करून बँकेचे, बँक खातेदार व गुंतवणूकदार यांचे १४५.६० कोटी रुपयांचा अपहार केला म्हणून एकूण ५७ आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल असून त्याचा तपास गुन्हे अन्वेषण विभाग, नागपूर येथे चालू आहे.

नमूद गुन्हयातील फरारी आरोपी नामे विजयकुमार रामचंद्र दायमा हा गुन्हा दाखल झाल्या पासून स्वतःचे अस्तित्व लपवून पुणे, मुंबई, नागपूर व तेलंगाना राज्य येथे राहत होता. त्याचेबाबत नातेवाईकांकडे शोध घेवूनही तो मिळून येत नव्हता. सदर आरोपी हा बँकेचा कर्जदार असताना त्याने समता बँकेकडून कोणत्याही प्रकारचे तारण सिक्युरीटी न देता बिल्स सूटसुविधा प्राप्त करून कर्जाची परतफेड न करता बँकेतील व्यवस्थापक व इतर यांना हाताशी धरून बँकेतून कपट बुद्धीने आर्थिक प्राप्ती करून फसवणूक केलेली आहे. त्याच्या विरुद्ध मा. विशेष न्यायालयाने एनबीडब्ल्यू वॉरंट व जाहीरनामे प्रसिध्द करुन देखील नमुद आरोपी हा मा. न्यायालयात हजर न होता स्वतःचे अस्तित्व लपवून फरार होता. मागील १७ वर्षापासून सदर आरोपीचा शोध घेण्यात येत होता.

नमुद गुन्हयातील फरार आरोपी नामे **विजयकुमार रामचंद्र दायमा रा. फेअर व्हिव सोसायटी, गोदावरी होमस, गायत्रीनगर, सुचित्रा जेडीमेटला, हैद्राबाद, राज्य - तेलंगाना** येथे राहत असलेबाबत खात्रीलायक माहिती राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे यांना खात्रीलायक गोपनीय माहिती मिळाल्याने नियोजित सापळा रचुन त्याला दिनांक १२/०५/२०२४ रोजी शिताफीने ताब्यात घेऊन त्यास पुढील योग्य त्या कार्यावाहीस्तव गुन्हे अन्वेषण विभाग, नागपूर यांचे ताब्यात दिले.

सदर कामगिरी ही मा.अपर पोलीस महासंचालक,गु.अ.वि.म.राज्य.पुणे, श्री.प्रशांत बुरडे, यांचे मार्गदर्शनाखाली मा. विशेष पोलीस महानिरीक्षक रा.गु.अ.के., गु.अ.वि.म.राज्य.पुणे डॉ.दिलीप पाटील- भुजबळ, , मा. पोलीस अधीक्षक,तांत्रिक सेवा,गु.अ.वि.म.राज्य.पुणे श्रीमती. वैशाली माने, , यांचे नेतृत्वात पोलीस निरीक्षक श्री. आनंद रावडे, पो.हवा. विकास कोळी, सुनिल बनसोडे, प्रदीप चव्हाण सर्व नेमणुक गु.अ.वि.म.राज्य.पुणे यांनी केलेली आहे.